पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८ **लेखा विभाग** ८७६
क्र.लेखा/१अ/कावि/ ८८ /२०१९
दिनांक १८/०१/२०१९

**विषय:-निविदा नस्ती मा.आयुक्त यांचेकडे लेखा विभागामार्फत अभिप्रायाकामी सादर करताना घ्यावयाचे दक्षतेबाबत.....**

**परिपत्रक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागांमार्फत विविध विकास कामांच्या निविदा काढण्यात येतात. तसेच वस्तु व सेवा खरेदीकामी निविदा कार्यपध्दतीचा अवलंब केला जातो. सदर निविदा प्रक्रिया योग्य रितीने राबविणेबाबत यापुर्वी वेळोवेळी मार्गदर्शक सुचना,परिपत्रके,आदेश व शासन निर्णय निर्गत करण्यात आले असुन त्यातील सुचनांचे पालन करून निविदा नस्ती मान्यतेसाठी मा.आयुक्त यांचेकडे सादर केल्या जातात.

दि.२५/१०/२०१८ च्या परिपत्रकान्वये र.रू.५ कोटी ते ५० कोटी पर्यंतच्या सर्व नस्त्या ह्या मुख्य लेखा अधिकारी यांचे मार्फत मा.आयुक्त यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार निविदा नस्त्या मान्यतेसाठी मा.आयुक्त यांचेकडे सादर करणेपुर्वी आवश्यक त्या बाबींची पुर्तता करूनच निर्गमित करणे आवश्यक आहे.

सबब,निविदा नस्त्या कशा प्रकारे मा.आयुक्त यांचेकडे सादर कराव्यात याबाबत नव्याने सुचना निर्गमित करणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे. व त्यानुसार निविदा नस्ती लेखा विभागाकडे सादर कराव्यात.

१) प्रत्येक विभागांतर्गत निविदा मुल्यमापन समिती यापुर्वीच गठीत करण्यात आली असुन सदर समितीने सहभागी निविदाधारकांची आर्थिक / तांत्रिक क्षमतेची कागदपत्राद्वारे तपासणी करून पात्र / अपात्र निविदाकार ठरविणे आवश्यक आहे. ज्या कामांसाठी सल्लागारांची नेमणुक करण्यात आलेली आहे. अशा निविदाधारकांची पात्रता / अपात्रतेचे मुल्यमापन करताना सल्लागारासही सहभागी करून घ्यावे.

२) दक्षता व नियंत्रण विभागामार्फत यापुर्वी निर्गत करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार तरतुदीच्या मर्यादेतच कामाची निविदा असणे आवश्यक आहे.

३) निविदाकाराकडुन प्राप्त झालेले दर योग्य व वाजवी असल्याची विभागाची खात्री होत असल्यास निविदा नस्ती अभिप्रायासाठी पाठवावी. स्विकृत दराबाबत विभागाने प्रस्तावित केलेला दर हा योग्य, वाजवी, व्यवहार्य असल्याची विभागाने खात्री करणे आवश्यक आहे. व त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर राहील.

४) आदेश क्र.लेखा/६/कावि/१०५७१/२०१८ दि.१०/०९/२०१८ लगत दिलेल्या सुचनेनुसार कामाची निविदा काढण्यापुर्वी कामाची जागा / जमिन किमान ५०% ताब्यात असणे आवश्यक आहे. तसेच कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी ८०% जमिन ताब्यात असावी व त्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात यावे.

५) जी कामे २ ते ३ वर्षात पुर्ण करावयाची आहे. त्यांचेसाठी Cash flow statement निविदा नस्तीसोबत जोडावेत.

६) कामाचे अंदाजपत्रक शासनाकडील SSR नुसार तयार केले जाते तथापि, दरसुची व्यतिरिक्त बाबींचे दर ठरविताना (Rate Analysis) विहित कार्यपध्दतीचा अवलंब करण्याची विभागाने दक्षता घ्यावी.

७) स्विकृती योग्य दर निश्चित करताना नियमांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

८) वस्तु व सेवा खरेदीबाबत महाराष्ट्र शासन उद्योग,उर्जा व कामगार विभागाकडील दि.१/१२/२०१६ चे शासन निर्णयामधील सर्व अटींची पुर्तता होत असल्याबाबत विभागाने दक्षता घ्यावी.

९) शासनाचे वेब पोर्टलवर (GeM) निश्चित केलेल्या पुरवठाधारकांकडुन विभागाने खरेदी करणे आवश्यक असुन तिथे उपलब्धता नसल्यास दि.०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

१०) कोणत्याही कामाची निविदा काढण्यापुर्वी विभागातील अभियंते यांनी कामाच्या आवश्यकते व उपयुक्तता प्रमाणित करून सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेण्यात यावी.

११) विभागाने निविदा स्विकृतीसाठी मा.आयुक्त यांचेकडे सादर करताना सर्व बाबींची पुर्तता होत असल्यासच नस्ती सादर करावी भविष्यात याबाबत काही आर्थिक अनियमितता उद्भवल्यास त्यास संबंधित विभाग जबाबदार राहील.

वरील मुद्दे हे केवळ दिशादर्शक आहे विभागाने या व्यतिरिक्त निविदा मान्यतेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रिया ही अधिक पारदर्शी व व्यापक स्पर्धेला उद्युक्त करणारी अशी असावी याची खबरदारी सर्व विभागप्रमुखांनी घेणे आवश्यक आहे.

**(श्रावण हर्डीकर)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगपालिका,
पिंपरी-४११०१८

प्रति,

सर्व संबंधित विभागप्रमुख / शाखाप्रमुख